नि.फौ.ख.क्र. १९४/२०२३

सरकार –वि– राहुल चौधरी व इतर

नि.क्र. ३४३

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक १६ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – ज्ञानेश्वर हरीभाऊ घोपे,

वय. ३० वर्षे, व्यवसाय – मजुरी,

राहणार – भोनगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री. के. व्ही. गारमोडे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

१. आरोपींना मी नावाने ओळखत नाही. आरोपींना मी चेहऱ्याने ओळखतो. न्यायालयात उपस्थित असलेल्या आरोपींपैकी मी रविंद्र बढे याला मी ओळखतो. आता मला दोषारोपपत्रामधील आरोपीचे फोटो दाखविले असता मी राहूल चौधरीला ओळखतो. माझे वडीलांचे नाव हरीभाऊ नारायण घोपे आहे. माझे वडील शेती करतात व त्यांची शेती भोनगाव शिवारात आहे. माझ्या वडीलांच्या शेतीचा गट नं. ५६९ आहे. माझ्या वडीलांकडे १ हेक्टर २३ आर शेती आहे.

२. सन २०२२–२३ मध्ये माझ्या वडीलांनी शेतात हरभरा पेरला होता. सन २०२३ मध्ये राहुल चौधरी याच्या तर्फे तीन चार व्यक्ती माझ्या घरी आले व मी राहुल चौधरीला ६९१ किलो हरभरा ५०००/– रुपये क्वींटल या भावाने विकला. राहुल चौधरी याने मला धनादेशामार्फत भरभऱ्याचे भुगतान केले होते. मला दिलेला धनादेश तीस दिवसाच्या आतमध्ये बँकेत सादर करण्यात यावा असे राहुल चौधरीच्या माणसाने मला सांगितले होते. काही दिवसांनी राहुल चौधरीचे माणसे येवून मला त्यांनी पैसे दिले व माझ्याकडचा स्टेट बँकेचा धनादेश घेवून गेले. तपास अधिकाऱ्यांना मला देण्यात आलेल्या धनादेशाची छायांकीत प्रत व ७/१२ ची सत्यप्रत तपासी अधिकाऱ्याला दिली होती. आता मला ७/१२ उतारा दाखविण्यात आला. तो माझ्या वडीलांचया नावाचा आहे. त्याला **<u>नि.क्र.३४४</u>** देण्यात येते. पोलीसांनी माझी चौकशी करुन माझा जबाब नोंदविला नव्हता.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरुन सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येत आहे</u>.**

३. अंबादास निनाजी खेडकर यांना मी ओळखतो कारण की ते माझ्या गावचे

आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अंबादास निनाजी खेडकर यांच्या मार्फत मी राहुल चौधरी याच्यासोबत सौदा करुन चना विकला होता. हे म्हणणे खरे आहे की, हरभऱ्याचा माल घेण्यासाठी ४०७ गाडी माझ्या घरी आली होती व गाडीमध्ये हमाल व इलेक्ट्रीक काटा सुध्दा होता. हे म्हणणे खरे नाही की, अंबादास निनाजी खेडकर याने तीस दिवसाच्या आत आम्ही तुम्हाला रोख रक्कम देवू व त्यावेळेस तुम्हाला देण्यात आलेला धनादेश आम्ही परत घेवू. हे म्हणणे खरे आहे की, मला ३४,५५०/– रुपये रोख रक्कम मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, हरभरा विक्रीचा संपूर्ण व्यवहार अंबादास खेडकर यांच्या मार्फत झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, राहुल चौधरी बाजार भावाच्या जास्त दराने शेतमाल खरेदी विक्री करत होता. हे म्हणणे खरे आहे की, राहुल चौधरी याने बऱ्याच शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाची रक्कम न देता त्यांची फसवणुक केली. राहुल चौधरी याने शेतकऱ्यांना दिलेला धनादेश वटला नाही की काय याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, राहुल चौधरी याने शेतकऱ्यांचा माल विकत घेवून त्यांना पैसे न देता फरार होवून गेला होता. हे म्हणणे खरे नाही की, अंबादास खेडकर यांच्यामार्फत माझा व्यवहार झाला नव्हता हे मी खोटे सांगितले आहे. पोलीसांनी माझा बुलडाणा येथे जबाब घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ व ५ तर्फे श्रीमती व्ही. व्ही. कुमकुले, वकील यांचे मार्फत.</u>**

४. हे म्हणणे खरे नाही की, मी राहुल चौधरी याच्यासोबत प्रत्यक्ष व्यवहार केला नाही. राहुल चौधरी माझ्या घरी माल घेण्याकरीता आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मालाचे सर्व पैसे मला आज परत मिळाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझी आरोपी राहुल चौधरी याच्या विरोधात कोणतीही तक्रार नाही. माझ्या जबाबात संपूर्ण व्यवहार अंबादास निनाजी खेडकर यांनी केला हा मजकूर चुकीचा आहे. माझ्या जबाबात धनादेश राहुल चौधरी याच्या नावाचा होता हा मजकूर नमुद आहे व तो बरोबर आहे. माझ्या जबाबात नमुद असलेला मी राहुल चौधरीला ओळखत नाही हा मजकूर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, राहुल चौधरी याच्या सोबत माझा माल विक्रीचा प्रत्यक्ष व्यवहार झाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे जबाब नोंदविला नव्हता व माझा नोंदविलेला जबाब मला वाचून दाखविण्यात आला नव्हता.

**<u>उलटतपास आरोपी क्र.६ तर्फे श्री. पिसे, वकील यांनी नाकारला.</u>**

**<u>आरोपी क्र.२ चे विधीज्ञ श्री. इंगळे यांचा ०१.०० वाजता वारंवार पुकारा केला असता</u>**

गैरहजर. आरोपीने साक्षीदाराला काहीही विचारायचे नसल्याचे सांगितल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास नाही.

आरोपी क्र.३ व ४ चे विधीज्ञ श्री. इखारे यांचा ०१.०० वाजता वारंवार पुकारा केला असता गैरहजर. आरोपीने साक्षीदाराला काहीही विचारायचे नसल्याचे सांगितल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत
स्वा/-
(एन. डी. मेश्राम )
न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव
दि.२५.०३.२०२६

माझे समक्ष
स्वा/-
(एन. डी. मेश्राम )
न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव
दि.२५.०३.२०२६